डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
**कृषि विज्ञान केंद्र, वर्धा (सेलसुरा)**
पो.सेलसुरा जि.वर्धा

इ मेल -kvkselsura@pdkv.ac.in/kvk.wardha@gmail.com

जा.क्र.कृविके/सेल/११०/२०२६ दिनांक २८/४/ २०२६

**दरपत्रक मागणी पत्र**

प्रती

१..................................................

२..................................................

विषय :-कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि.वर्धा या कार्यालया मार्फत आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये आयोजीत विविध प्रशिक्षण व कार्यक्रमा करीता जेवण, चहा, व नास्ता (फराळ) करीता दर पुरविण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने, कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि.वर्धा यांचे कार्यालयामार्फत आर्थीक वर्ष सन २०२६-२७ मध्ये कार्यालयात व जिल्हयात (प्रक्षेत्रावर व प्रक्षेत्राबाहेर ), आयोजीत विविध कार्यक्रमाकरीता जेवण, चहा, व नास्ता (फराळ) दर मागविण्यात येत आहेत. कार्यक्रमाकरीता कमीत कमी १५ ते ६०० पेक्षा जास्त लाभार्थी उपस्थित राहू शकतात. तरी खालील प्रमाणे नमुद केलेल्या विवरणासाठी आपले दरपत्रक पाठवावे.

| अ. क्र. | विवरण | तपशिल | सेलसुरा प्रक्षेत्र दर (रु.) | सेलसुरा बाहेर दर (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | चहा | चहा | | |
| २ | कॉफी | कॉफी | | |
| ३ | नास्ता | (पोहे / उपमा/ कडधान्य उसळ /समोसा /कचोरी/ आलुवडा/ मुंगवडा / दहीवडा/भजे/इडली सांबार/ढोकळा/वडा सांबार इ.) | | |
| ४ | उपवास पदार्थ | भगर/साबुदाना उसळ/साबुदाना वडा/फराळी चिवडा इ. | | |
| ५ | अल्पभोजन : | भाकर+ पिठलं / भाकर+ भरीत / मसालेभात+ कढी / पुरी+ भाजी / आलु पराठे, व सलाद इ. | | |
| ६ | साधे जेवण : | वरण+ भात+ भाजी(१) + पोळी /भाकर + सलाद / कोथींबीर + चटणी + लोणचे इ. | | |
| ७ | स्पेशल जेवण : | वरण/दाल फ्राय + भात/जिरा राईस + भाजी (२) सुकी व रस्सा + पोळी /भाकर + एक स्वीट डिश (मर्यादित) + पापड + भजे+ लोणचे+ सलाद इ. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | डिलक्स जेवण : | वरण/दाल फ्राय + भात/जिरा राईस + भाजी (३) सुकी व रस्सा + पोळी /भाकर /पुरी + पापड भजे+ लोणचे+ सलाद + दही+ कढी / मठ्ठा इ.+ एक स्वीट डिश (बासुंदी, कालाजामून, आमरस, रसमलाई, श्रीखंड) इ. | | |
| ७ | सुपर डिलक्स जेवण | सुप+ वरण/दाल फ्राय + भात/जिरा राईस/पुलाव/ व्हेज बिर्याणी + भाजी (३) सुकी व रस्सा, कडधान्य उसळ + पोळी /भाकर/पुरी/पराठा /तंदुरी/नान + पापड भजे/वडे/अळूवडी/सांबार वडी+ लोणचे+ सलाद + दही+ कढी / मठ्ठा इ.+ एक स्वीट डिश (पुरणपोळी, खवापोळी) इ. | | |

कृपया दर नमुद करतांना खालील दिलेल्या सुचना काळजी पूर्वक लक्षात घ्याव्यात

१. दरपत्रक बंद पाकीटात पाठवावेत.
२. दरपत्रकाच्या पाकिटावर पुढील प्रमाणे नमुद करावे जेवण व चहापाणी पुरविण्यासाठी दरपत्रक आपले संदर्भांकित चौकशी पत्रक जा.क.कृविके/सेलसुरा/११०/२०२६ दि.२८/०४/२०२६
३. दरपत्रक पोहोचविण्याची अंतीम तारीख व पत्ता दि. ५/०५/२०२६ पर्यंत दुपारी ५:०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा येथे पोहोचणे आवश्यक आहे.
४. जेवण, चहा व नास्ता (फराळ) पुरवठा धारकांकडे अन्न व औषध प्रशासनाचा परवाना असणे बंधनकारक आहे.
५. देयक / बिल हे GST क्रमांकासह असणे बंधनकारक आहे.
६. जेवणाची गुणवत्ता चांगली तसेच भोजन व भोजनानंतरची स्वच्छतेची काळजी घेणे आवश्यक आहे. तसे न आढळल्यास कोणत्याही क्षणी कंत्राट रदद करण्याचे अधिकार या कार्यालयाला राहतील.
७. दोन वेळचा चहा, पाणी व भोजन वाढण्याची जबाबदारी आपली स्वत:ची राहील याची नोंद घ्यावी.
८. सदर कार्यक्रमांकरीता कमीत कमी १५ ते ६०० किंवा जास्त लाभार्थी हजर राहू शकतात त्यामुळे आवश्यकते प्रमाणे कार्यक्रमात जेवण, चहा व नास्ता (फराळ) पुरविण्यात येणे बंधनकारक आहे.
९. आर.ओ पिण्याच्या पाण्याची सोय करणे बंधनकारक राहील.
१०. कार्यक्रमानंतर देयकावर प्रकीया झाल्यानंतर जवळपास १ महिण्यानंतर देयकाची रक्कम अदा करण्यात येईल.
११. प्रक्षेत्राबाहेर दर देतांना वाहनभाडेसह दर देण्यात यावे त्याकरीता नंतर देयकामध्ये वेगळे भाडे चार्ज देता येणार नाही.

वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख,
कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि.वर्धा